पुढारी

# विद्यापीठात अक्षय बागम यांचा सत्कार

कोल्हापूर : शाहूवाडी तालुक्यातील परळे पैकी कोदे येथील



अक्षय बागम यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक अभियंता पदावर निवड झाली. कुलगुरू डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचा विद्यापीठात सत्कार करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा विभागाचे ते विद्यार्थी आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागात ते रुजू होणार आहेत. केंद्रीय सीमा सडक संघटन व भारतीय रेल्वेत कनिष्ठ अभियंता पदावर त्याची याच दरम्यान स्पर्धा परीक्षेद्वारे निवड झाली आहे.

लोकमत

# विद्यापीठाकडे २९ हजार पदवीधरांची नोंद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेच्या (सिनेट) प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर व शिक्षक, विद्यापरिषदेत निवडून द्यावयाचे आठ शिक्षक आणि अभ्यासमंडळासाठी निवडून द्यावयाचे विभागप्रमुख यासाठी मतदारयादी तयार केली जाणार आहे. त्यासाठी ऑनलाइन नोंदणीची मुदत गुरुवार (दि.७)पर्यंत आहे. सोमवारी दुपारी तीनपर्यंत एकूण २९,१३८ नोंदणीकृत पदवीधर, १८१ महाविद्यालयांच्या शिक्षक, १७० महाविद्यालयांच्या विभागप्रमुख, शंभर महाविद्यालयांचे प्राचार्य आणि ९१ व्यवस्थापन प्रतिनिधींनी ऑनलाइन नोंदणी केली.

मुदत सात दिवसांसाठी वाढविली. कोणीही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेऊन गुरुवारपर्यंत ऑनलाइन अर्ज भरावेत. ऑनलाइन भरलेली माहिती वा अर्ज आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयाकडे ११ जुलैला सायंकाळी ६ पर्यंत स्थळ प्रत स्वरूपात जमा करावेत, असे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

पुढारी

# पदवीधर मतदार नोंदणीसाठी ७ जुलैपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेच्या प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर व शिक्षक तसेच विद्यापरिषदमध्ये निवडून द्यायचे आठ शिक्षक आणि अभ्यास मंडळासाठी निवडून द्यायचे विभागप्रमुख यासाठी मतदार यादी तयार करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याची मुदत ७ जुलैपर्यंत वाढविण्यात आली आहे.

अधिकाधिक मतदारांना नोंदणी करता यावी यासाठी ही मुदत ७ दिवसांसाठी वाढविली होती. आजअखेर नोंदणीकृत पदवीधरांनी १८९ महाविद्यालयातील शिक्षक, १७० महाविद्यालये विभागप्रमुख, १०० महाविद्यालये प्राचार्य व ९९ व्यवस्थापन प्रतिनिधींची ऑनलाईन नोंदणी प्राप्त झाली आहे. कोणीही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही यासाठी ७ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज भरता येणार आहेत.

ऑनलाईन भरलेली माहिती, अर्ज आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयाकडे १९ जुलैपर्यंत सांयकाळी सहा वाजेपर्यंत हार्ड कॉपी स्वरूपात जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

सकाळ

# मतदार नोंदणीसाठी गुरुवारपर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाची मतदार यादी तयार करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याची मुदत ७ जुलैपर्यंत वाढवली आहे. अधिसभेच्या प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर, शिक्षक, विद्यापरिषदेमध्ये निवडून द्यावयाचे आठ शिक्षक, अभ्यास मंडळासाठी निवडून द्यावयाचे विभागप्रमुख यासाठी मतदार यादी आहे. आजपर्यंत २९ हजार १३८ नोंदणीकृत पदवीधरांची, १८९ महाविद्यालयांच्या शिक्षकांची, १७० महाविद्यालय विभागप्रमुखांची, १०० प्राचार्यांची, ९९ व्यवस्थापन प्रतिनिधींची नोंदणी झाली आहे.

अधिकाधिक मतदारांना नोंदणी करता यावी, यासाठी मुदत वाढविली होती. त्यासाठी कोणीही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता संबंधितांनी घेऊन ७ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज भरावेत.

तरुण भारत

# विद्यापीठ निवडणुकीसाठी २९१३८ पदवीधर मतदारांची नोंदणी

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळासाठी पदवीधर मतदार नावनोंदणीला ७ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आतापर्यंत २९ हजार १३८ पदवीधर मतदारांनी नावनोंदणी केली आहे. तसेच १८१ महाविद्यालयांच्या शिक्षकांची, १७० महाविद्यालय विभागप्रमुखांची, १०० महाविद्यालय प्राचार्यांची आणि ९१ व्यवस्थापन प्रतिनिधींची ऑनलाईन नोंदणी केली आहे. या आशयाचे परिपत्रक विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केले आहे. आणखी तीन दिवस नावनोंदणीसाठी मुदत असल्याने आणखी जवळपास दीड ते दोन हजार मतदारांची नोंदणी होणार आहे, असा अंदाज शिक्षण संस्था, विद्यार्थी संघटनांकडून व्यक्त होत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेचे प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर, शिक्षक तसेच विद्यापरिषदेची निवडणुक ऑगस्टनंतर होणार आहे.



- विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परिपत्रक जाहीर
- नावनोंदणीला मुदतवाढ मिळाल्यापासून ७६३८ जणांची नोंदणी

अधिकाधिक मतदारांना नावनोंदणी करता यावी म्हणून विद्यापीठाने मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे गतवर्षीपेक्षा जवळपास ३० टक्के जास्त नावनोंदणी झाली आहे. यंदा नावनोंदणीला चांगला प्रतिसाद मिळत असल्याने मुदतवाढ मिळाल्यापासून पाच दिवसात ७६३८ मतदारांनी ऑनलाईन नावनोंदणी केली आहे. तर काही शिक्षण संस्थांकडून नावनोंदणी केलेली नव्हती अशा शिक्षण संस्थांनाही नावनोंदणीसाठी दिलासा मिळाला आहे. त्यामुळे शिक्षण संस्थाचालक आणि विद्यार्थी संघटनांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.